# कर्मवीरांच्या कर्तृत्वाची माहिती विद्यार्थ्यांना प्रेरणादायी

## डॉ. विश्वनाथ मगदूम यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शनिवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी थोरांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय व्हावा, या उद्देशाने निमशिरगाव येथील देशभक्त रत्नाप्पाआण्णा कुंभार यांनी शिक्षण घेतलेल्या कुमार विद्यामंदिर या ठिकाणी भेट दिली. प्रा. नंदकुमार कुंभार आणि प्र. शांताराम कांबळे यांनी त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याविषयी स्वयंसेवकांना माहिती दिली.

रयत गुरुकुलचे मुख्याध्यापक सागर माने यांनी स्वयंसेवकांना कर्मवीरांच्या कार्याविषयी डॉक्युमेंटरीद्वारे माहिती दिली. तसेच कर्मवीरांच्या नावे उभारलेल्या म्युझियमला भेट देऊन त्यांच्याविषयी स्वयंसेवकांनी माहिती घेतली. या दोन्हीही भेटी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील, असे प्रतिपादन कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी केले.



त्यानंतर स्वयंसेवकांनी कुंभोज येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मस्थळी असणाऱ्या स्मारकास भेट दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक बन्ने, निमशिरगावच्या सरपंच अश्विनी गुरव आणि उपसरपंच रोहित लोहार, देवळापूरकर, डॉ. बृहस्पती शिंदे, अमित पाटील इ. उपस्थित होते.

पुण्यनगरी 5-11-23